-----------------------------------------------------

Media Coverage – Health Initiative to raise awareness and offer tips to Wanzarwadi females

पुढारी



आरोग्याविषयी मार्गदर्शन करत असताना डॉ. प्रियांका जळक.

## वंजारवाडीत महिलांसाठी आरोग्यजागर

बारामती : वंजारवाडी (ता. बारामती) येथे स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रियांका जळक यांचे स्त्री आरोग्याविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. या माध्यमातून किशोरवयीन मुलींपासून वृद्ध महिलेने घ्यावयाच्या आरोग्याच्या काळजीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. येथील भारत फोर्ज (कॅम) यांच्यावतीने महिलादिनानिमित्त या उपक्रमाचे आयोजन केले होते. घरातील महिला वर्गामध्ये असलेले समज-गैरसमज व सामाजिक रूढी, परंपरांमुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. त्यामुळे आरोग्यविषयक जाणीव जागृती करणे गरजेचे आहे, असे कल्याणी कम्युनिटी सेंटरच्या समन्वयिका राजश्री नेवसे यांनी सांगितले. विद्यार्थिनी, शिक्षिका, महिला, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. मुख्याध्यापिका सुरेखा भालेराव यांनी सूत्रसंचालन केले. भारत फोर्ज बारामतीचे प्रकल्पप्रमुख सुशांत पुस्तके व एच. आर. मॅनेजर सदाशिव पाटील यांनी यासाठी मार्गदर्शन केले.

Pune Gramin Edition
14 Mar, 2018 Page No. 4
Powered by : erelego.com